Journal of East-West Thought
ISSN: *2168-2259 (online)*
(*https://jetjournal.us/*)
Volume 15, Issue 1, Jan-March – 2025 Special Issue 1
Impact Factor: 7.665, Peer Reviewed and UGC CARE I

# स्त्रीत्वाचे भान आणि ऐतिहासिक पार्श्वभूमी

प्रा. डॉ. सतीश जगन्नाथ निकम, सहयोगी प्राध्यापक, विद्या वर्धिनी महाविद्यालय, धुळे.

आधुनिक कालात आज असे एकही क्षेत्र असे आढळून येणार नाही, कि ज्यात स्त्रियांनी आपल्या अस्तित्वाचा, प्रगतीचा झेंडा रोवला नाही. प्रत्येक क्षेत्रात आपल्या कौशल्याच्या बळावर स्त्रियांनी आपल्या यशाची मोहोर ठळकपणे उमटविली आहे. आज जेव्हा स्त्रियांनी केलेल्या कामगिरीचे मूल्यमापन केले जाते तेव्हा यामागे स्त्रीला तिचे आत्मभान जागृत झाल्याचा निष्कर्ष अनेक विद्वान काढतात. "आपल्या स्त्रीत्वाचे जन्मदत्त आणि व्यक्तिगत पैलू कोणते आणि समाजदत्त पैलू कोणते याचे तिला आकलन होऊ लागले. हे आकलन तिला आतून उजळून टाकणारे होते, तसेच भोवतालच्या समाजाकडे नव्या दृष्टीने पाहायला लावणारे."[१] परंतु ही कारणमीमांसा पुरुषसत्ताकतेच्या दमनकारी इतिहासाची दडपणूक आहे. जर त्या इतिहासाला दुर्लक्षून आजच्या स्त्रीला स्त्रीत्वाचे भान होत राहिले, तर त्यांचा अस्तित्वाचा प्रश्न पुन्हा निर्माण झाल्याशिवाय राहणार नाही.

स्त्रियांच्या वंचीततेचा मागोवा घेतल्यास ते पुरुषप्रधान व्यवस्थेने जाणीवपूर्वक रुजविलेल्या मिथमध्ये आढळते ते म्हणजे, लिंगभेदाधारीत दुय्यमत्व. डॉ. मिलिंद बोकील प्राणिजगतातील बोधप्रत उदाहरण देऊन तसेच आफ्रिका, उत्तर अमेरिका आणि भारतासह काही आशियाई जमातींचे उदाहरण देऊन म्हणतात, "शारीरिक क्षमता म्हणजे केवळ दंडातील ताकद नव्हे. शारीरिक क्षमतेमध्ये स्नायूंची लवचिकता, सहनशक्ती, ताण सोसू शकणारी क्षमता, चिकाटी, जोम आणि कंटाळा येऊ न देता सातत्याने कष्ट करण्याची क्षमता अशा निरनिराळ्या गोष्टींचा समावेश होतो."[२] डॉ. बोकिलांच्या विधानावरून आपणांस हे लक्षात येते की, स्त्रियांचे दुय्यमत्व हे नैसर्गिक असल्याचे केवळ एक मिथ उभे करण्यात आले आहे. स्त्रीचं स्त्री असणं किंवा पुरुषाचं पुरुष असणं ही बाब कोणत्याही रीतीने कोणावर दुय्यमत्व लादू शकत नाही.

भारतीय संदर्भात स्त्रियांवर लादण्यात आलेल्या दुय्यमत्वाची कारणमीमांसा पाहण्या अगोदर जागतिक भूमिकेतून जी मांडणी करण्यात आली ती ही महत्वाची आहे. "दोन युद्धांच्या काळात उजव्या हुकुमशाही शक्तींचा उदय झालेला दिसतो... नाझी संस्कृतीने राष्ट्रवाद, लैंगिक आणि वांशिक श्रेष्ठवाद आणला आणि मात्तृत्व आणि कुटुंब यांचे उदात्तीकरण करण्याचे मोठे प्रयत्न केले."[३] जगाच्या इतिहासाचे अवलोकन केले असता आपणांस हे लक्षात येते की, जगाच्या पाठीवर कुठेही उजव्या,


Copyright © | JET Network, All Rights Reserved

प्रतिगामी, धर्मांध किंवा हुकुमशाही शक्ती सत्तेवर आलेल्या आल्या असतील तर त्यांनी स्त्रियांना नेहमीच वंचित, दुर्लक्षित, दुय्यम आणि अन्यायग्रस्त ठेवले आहे.

आपली वर्चस्ववादी विचारधारा थोपवितांना प्रतिगामी शक्ती अशा पद्धतीने एखाद्या बाबीचे उदात्तीकरण करून एखादं मंद विष लोकांच्या गळी उतरवितात की शासित वर्गातील लोक ज्यांच्या विरोधात त्या गोष्टी असल्या असल्या तरी त्या गोष्टींचे ते समर्थक बनतात. धर्मांध – हुकुमशाही शक्ती अशा मानवी वर्तनशास्त्राचा उपयोग करत असतात. या पार्श्वभूमीवर डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे प्रतिपादन "गुलामाला त्याच्या गुलामगिरीची जाणीव करून द्या म्हणजे तो बंड करून उठेल." हे खूप मूलगामी ठरते.

वेगवेगळ्या माध्यमातून जे 'आदर्श स्त्री' चे चित्र उभे करण्यात आले आहे, त्यानुसार आदर्श स्त्री म्हणजे कोणती स्त्री, तर जी गृहकृत्यदक्ष असेल, जी पतीची सेवा करेल, त्याच्या आज्ञेतच राहील, घरातील सर्वांच्या आधी उठून सर्वांच्या नंतर झोपेल, पतीच्या नंतरच जेवेल, धार्मिक व्रत-वैकल्यांचे पालन करेल अशा एक ना अनेक गोष्टी ज्या पुरुषसत्तेने लादल्या असतील त्यांचे गुमानं पालन करणारी स्त्री म्हणजे आदर्श स्त्री, असे मानले जाते. पारंपारिक दृष्टीने, "पिता रक्षिते कौमार्य, भर्ता रक्षिते यौवने, रक्षन्ति स्थविरे पुत्रा, न स्त्री स्वातंत्र्य मर्हति"[४] अर्थात, बालवयात वडील स्त्रीचे रक्षण करतात, तारुण्यात नवरा रक्षण करतो, म्हातारपणी मुलगे रक्षण करतात. स्त्रीला कधीही स्वातंत्र्य नसते. अशारितीने स्त्रीचे स्वातंत्र्य फार पूर्वीच लयास गेले होते.

मनुस्मृती म्हणजे तत्कालीन आचारसंहिताच होती. त्यामुळे मनुस्मृती आधारे स्त्रीला गुलामीत लोटण्यात आले होते. स्त्रीसाठी मर्यादांची चौकट तयार करण्यात आली होती. नियम- बंधनांची चौकट मोडणे हा गंभीर गुन्हा समजण्यात येई. असे घडल्यास खाप पंचायत अथवा धर्मपीठ शिक्षा ठोठावत असत. धर्मशास्त्रांनी निर्माण केलेल्या दंडकांनी स्त्रीला अस्तित्वहीन केले होते. स्त्री निर्धन, पराधीन आणि परतंत्र करून टाकली. स्त्रीला तिच्या सर्वोच्च स्थानावरून अवनत करणाऱ्या इतिहासाचे विश्लेषण केल्याखेरीज स्त्रीभानाचे आकलन अशक्य आहे.

भारतीय स्त्रीमुक्ती चळवळ ऐतिहासिक विश्लेषणाअभावी केवळ मानवतावादी राहिल्या आहेत. म्हणून स्त्रियांच्या मुक्तता म्हणजे शासन- प्रशासनात सहभाग, खेळ- क्रीडा, सांकृतिक क्षेत्रात प्रमाण वाढविणे अशा बाबीं पुरतेच मर्यादित राहिले आहे. शिक्षण- नोकरी करण्यासाठी स्त्रीने बाहेर पडणे म्हणजे स्त्रीमुक्ती असा अतिशय मर्यादित अर्थ त्यास प्राप्त होतो. कोणत्याही समस्येचे मुलभूत आकलन केल्याशिवाय त्या समस्येची सोडवणूक अशक्य आहे. याठिकाणी पुनीत बिसारीया यांचे विधानाशी पूर्णतः सहमती असणे अशक्य असले तरी ते विचार करायला भाग पाडणारे आहे. ते म्हणतात, "खुद को


Copyright © | JET Network, All Rights Reserved

पिछडा और उत्पीडित रखने में स्त्रिया भी पीछे नहीं रही, वे इन बन्धनों को ख़ुशी ख़ुशी ओढने में गौरव का अनुभव करती है और उन्हें भी पुरुषों द्वारा प्रताड़ित महिलाएं ही आदर्श नारियाँ प्रतीत होती है।"[५] स्त्रियांचा विनयभंग, त्यांच्यावरील बलात्कार, दंगलीत प्रतिपक्षाच्या स्त्रीयांना जाणीवपूर्वक लक्ष्य करून होणारे अत्याचार, स्त्रीलक्षित शिव्यांचा वापर यामागील पुरुषसत्ताक वर्चस्ववादी विचारसरणी आपण दुर्लक्षित करत असतो.

शेतीच्या शोधापर्यंत मानव हा सातत्याने भटकंती करत होता. शेतीच्या शोधाने त्यास स्थैर्य प्राप्त झाले. त्यानंतर मानवी समूहाचा उत्क्रांतीचा वेग वाढला. शेतीचा शोध स्त्रियांनी लावला. हे सर्वच अभ्यासक आणि संशोधकांनी मान्य केले आहे. स्त्री आपल्याकडे असलेल्या एका विशिष्ट काठीच्या साहयाने शेती कर्म करत असत. कॉ. शरद पाटील यांचे या संदर्भात खूप मूलगामी आहे. शेती करण्यासाठी जी टोकदार काठी वापरली जाई तिला 'स्फ्य' म्हणत. "११.३.९ हा अथर्ववेदीय मंत्र सांगतो की, स्फ्य हे खळ्यात धान्य तयार करायचे व वृध्दिंगत करायचे अवजार आहे... महाभारत पृथ्वीला अकृष्टपच्या असे म्हणते. अ + कृष्ट + पच्या म्हणजे जंगली धान्य देणारी. या धान्याचे बी गणनिवासा समोरील वाडग्यात स्फ्य ने पेरून जगभर स्त्रीने आद्य शेती सुरु केली."[६]

"शेतीच्या शोधामुळे प्राचीन मानव स्थिर जीवन जगू लागला. तत्पूर्वी तो जनावरांच्या कळपाप्रमाणे राहत असे. मानव समाजाच्या या आद्यावस्थेला समाजशास्त्रज्ञांनी 'होर्डे' असे संबोधले आहे. तर इतिहासाचार्य वि. का. राजवाडे यांनी यास पाशव अवस्था किंवा युथावस्था असे म्हटले आहे."[७] मानव समाजाचे अशा आद्यावस्थेतून संक्रमण शेतीच्या शोधामुळे शक्य झाले. भटका मानव स्थिर झाल्यामुळे गण समाजाची निर्मिती झाली.

जनावरांच्या कळपाप्रमाणे राहणाऱ्या समाजाला कॉ. शरद पाटील निरवयवी समाज म्हणतात. "अशा या निरवयवी समाजातून पहिला अवयवी समाज, गणसमाज स्त्रीने जन्माला घातला. महाभारत त्याला स्त्रीराज्य म्हणते."[८] यावरून पहिला राजकीय समाज उदयास आला तो स्त्रियांनी शेतीचा शोध लावल्यानंतरच. म्हणून कॉ. शरद पाटील म्हणतात त्याप्रमाणे, "सर्वत्र स्त्रियांनीच शेतीचा शोध लावला आणि शेती उत्पादन व त्याचे वाटप स्त्रीकडे असल्याने तीच कुलमुख्या बनली. त्यामुळे मातृसत्ताक व्यवस्थेचा उगम झाला." शेतीचे उत्पादन आणि त्याचे विभाजन स्त्रियांचा नैसर्गिक अधिकार बनल्यामुळे आपसूकच सुरवातीच्या गणसमाजाचे नेतृत्व स्त्रियांकडे आले. "बॅकोफेन, ब्रीफॉ यासारख्या असंख्य संशोधकांनी पुरावे देऊन असा सिद्धांतच प्रस्थापित केला आहे, की भटक्या, पशुपालन अवस्थेतील लोकांची समाजरचना पुरुषप्रधान असते, तर प्राथमिक कृषीजीवी समाजाची रचना


Copyright © | JET Network, All Rights Reserved

Journal of East-West Thought
ISSN: 2168-2259 (online)
(https://jetjournal.us/)
Volume 15, Issue 1, Jan-March – 2025 Special Issue 1
Impact Factor: 7.665, Peer Reviewed and UGC CARE I

मातृसत्ताक, स्त्रीप्रधान असते."[९] अशा पद्धतीने स्त्रीराज्य निर्मितीची पार्श्वभूमी तयार होत जाऊन जगभर स्त्रीराज्ये अस्तित्वात आली.

प्रारंभिक राजकीय व्यवस्थेत स्त्रियांची मक्तेदारी होती. भारतीय राजकीय व्यवस्थेच्या प्रारंभिक अवस्था सभा आणि समितीच्या रूपाने द्विगृही होती. दोन्ही सभागृह स्त्रियांनी बनलेले असे. परंतु ही मक्तेदारी स्त्रियांना शेतीकर्म येते केवळ या कारणाने नव्हती, तर शेतीच्या उत्पादकतेमागे कृषीमायेचे तंत्र असते, ही धारणा त्यास प्रामुख्याने कारणीभूत होती. प्राचीनकाळी स्त्री ही मानवी जीवनाच्या क्षेत्रात सर्वोच्च स्थानी होत्या. त्या सर्वोच्च स्थानवरून का आणि कोणत्या परीस्थितीत अवनत झाल्या? हा प्रश्न स्त्रीदास्य मुक्तीच्या चर्चाविश्वात उभा केला शिवाय स्त्री मुक्ती ही केवळ नावालाच उरेल.

प्राचीन भारतातील संघर्षाचे ऐतिहासिक समालोचन करत असता, प्राचीन भारतीय संघर्ष पुरुषसत्ताक विरुद्ध असताना केवळ स्त्रीसत्ताक आर्य विरुद्ध अनार्य असाच मागोवा घेतला जात असल्याने ते अपूर्ण ठरते. पर्यायाने भारतीय समस्यांचे मुलभूत आकलन अपूर्ण ठरते. स्त्रियांना केवळ आज भेडसावणाऱ्या समस्यांच्या संदर्भातच स्त्री समस्यांची उकल होऊ शकत नाही. तर त्यासाठी स्त्रीराज्य ते स्त्रीदासता हा स्त्रीजीवनाचा प्रवास जाणून घेणे आवश्यक आहे.

स्त्रीसत्तेत स्त्रियांना प्रतिष्ठा प्राप्त होती तर पुरुषसत्ताकतेत स्त्रियांचे स्थान अवनत होते. या संदर्भात डॉ. स. रा. गाडगीळ यांनी अतिशय उद्‌बोधक मागोवा घेतला आहे . ते म्हणतात, "पुरुषप्रधान आर्य वैदिक समाजाने अनेक क्रूर चालीरीतींचा सहाय्याने या अनार्य जमातींच्या जीवनातील मातृसत्ताकाचे महत्व नष्ट करण्याच प्रयत्न करून पहिला. बालविवाह, बहुपत्नीकत्व, विधवांना दिली जाणारी अमानुष वागणूक आणि सतीची चाल या सर्व गोष्टी या दृष्टीने उद्‌बोधक आहेत. स्त्रीच्या तुलनेने पुरुष हाच श्रेष्ठ आहे ही पुरुषप्रधान समाजाची कल्पना येथील मातृसत्ताक प्रभावित समाजावर बिंबविण्यासाठी वैदिक आर्य परंपरेत वाढलेल्या विचारवंतांनी या चाली रूढ केल्या. स्त्रीमाहात्म्याचे अवमूल्यन इतका कठोर आणि आग्रही प्रयत्न जगात अन्यत्र कोठेही झालेला आढळत नाही."[१०] म्हणजेच आर्य- अनार्य संघर्ष हा प्राचीन भारतीय ऐतिहासिक संघर्षाचा केवळ मुलामा मात्र आहे, प्राचीन भारतातील खरा संघर्ष हा उगवती पुरुषसत्ता विरुध्द मावळती स्त्रीसत्ता आहे या कॉ. शरद पाटील यांच्या विधानाची सत्यता पटल्याशिवाय राहत नाही.

गाळपेर शेतीतंत्राच्या सहाय्याने जो पर्यंत शेती स्त्रियांकडून केली जात होती तोपर्यंत कृषीमायेच्या धारणेपोटी स्त्रिया तत्कालीन समाजाच्या सर्वोच्च स्थानी होत्या. परंतु कालौघात शेतीतंत्र बदलल्याने स्त्रियांचे स्थान ढळले. जनावरांचा शेती करण्यासाठी वापर ही बाब त्यादृष्टीने महत्वाची ठरली. "नैर्ऋतांनी वनमहिषी व वनगाय माणसाळवल्यानंतर हातांनी बी फेकून शेती करण्याऐवजी रेडे-


Copyright © | JET Network, All Rights Reserved

Journal of East-West Thought
ISSN: 2168-2259 (online)
(https://jetjournal.us/)
Volume 15, Issue 1, Jan-March – 2025 Special Issue 1
Impact Factor: 7.665, Peer Reviewed and UGC CARE I

बैलाच्या औतांनी मोठ्या प्रमाणावर शेती सुरु केली. पशुपालन हा पुरुषांचा व्यवसाय असल्याने शेतीची मशागत रेडे-बैलांनी होऊ लागताच शेती स्त्रियांकडून पुरुषांकडे गेली."[११] शेतीतंत्रातील बदल आर्यांच्या आक्रमणानंतर वेगाने घडून आला. कारण आर्य हे पशुपालक असल्याने जनावरांचा शेतीसाठी वापर त्यांनी करण्यास प्रारंभ केला.

"पशुपालक आर्यांच्या झंझावाती रथांच्या भरीव चाकांखाली सिंधुवक्त्र शेती तुडवली गेली. त्यांनी नदीमातृक व इंद्रवक्त्र असे भिन्न शेतीतंत्र विकसित केले. नदीमातृक म्हणजे नदीला तात्पुरता बंधारा घालून केलेली शेती व इंद्रवक्त्र म्हणजे देवाच्या पाण्यावरची शेती."[१२] शेतीतंत्रा च्या बदलातील एक महत्वपूर्ण निरीक्षण कॉ. शरद पाटील पुढे नोंदवितात, " आर्यांनी कृषीमाया व ऋत्विज संस्था अनार्यांपासून घेतली. परंतु आर्य हे पशुपालक असल्याने कृषीमाया त्यांना माहित नव्हती... क्षत्र (स्त्री) आणि ब्रह्मन् (पुरुष) यांच्या देवविवाहातून गण व सृष्टीचे पुनरुत्पादन होते हे कृषीमायेचे मुळसूत्र त्यांना माहित नसल्यामुळे... शेतीसाठी आवश्यक कृषीमाया हद्दपार झाली." कृषीमाया केवळ स्त्रीमुळे होत असल्याने जोपर्यंत कृषीमाया अस्तित्वात होती, तोपर्यंत स्त्रीची प्रतिष्ठा अबाधित होती. कृषीमायाच आर्यांनी हद्दपार केल्यामुळे स्त्रियांच्या प्रतिष्ठेचा आधारच नाहीसा झाला.

स्त्रियांच्या स्थानास धक्का देणाऱ्या इतर काही बाबीही कारणीभूत ठरल्या आहेत. आर्यांनी भारतवर्षात आपले निर्विवाद वर्चस्व प्रस्थापित केल्यानंतर येथील आर्थिक संरचनेतही बदल घडून आलेत. हॅवलॉक एलीस आपल्या मॅन अँड वुमेन या आपल्या ग्रंथात नोंदवितात, "पितृसत्ताक समाजाच्या प्रस्थापनेत कुटुंब हे आर्थिक एकक (युनिट) होऊन, स्त्री नवनिर्माणात मागे पडली, पुरुषाला दुय्यम झाली.त्यानंतर स्वतंत्र स्त्रिया लुप्त झाल्या."[१३] उत्पादन आणि विभाजन स्त्रियांच्या हाती होते, तोपर्यंत सामाजिक नियमन आणि नियंत्रण तिच्याकडे होते. त्या क्षेत्रातील स्त्रीची मक्तेदारी संपुष्टात आणून त्यांच्या दुय्यामत्वास सुरुवात झाली.

स्त्रीसत्ताक विरुद्ध पुरुषसत्ताकतेतील द्वंद्व प्रदीर्घ काळ सुरु होते. स्त्रियांवर लैंगिक नियंत्रणाच्या माध्यमातून स्त्रीवर पुरुषी नियंत्रण प्रस्थापित करण्यात आले. समाजामनावर मनुस्मृतीची जरब निर्माण केल्यामुळे त्यात नमूद वचनांचे पालन कटाक्षाने करण्याकडे कल होता. परिणामी कुटुंब या नव्या आर्थिक एककातही तिला अवनतावस्था प्राप्त झाली. मनुस्मृतीधारित चौकटीच्या जोखडात स्त्रीला कायमचे बंदिस्त करण्यात आले.

डॉ. मिलिंद बोकील यांनी स्त्रीसत्ताक विरुध्द पुरुषसत्ताक संघर्षाला विशिष्ट हितसंबंध असणारे विरुध्द तसे नसणारा असे संबोधतात. "हा विशिष्ट हितसंबंध अस्नता गट निरनिराळ्या काळी, निरनिराळ्या ठिकाणी निरनिराळे रूप असलेला होता. कधी पुरोहित वर्गाच्या रुपात, कधी राजसत्तेद्वारा,


Copyright © | JET Network, All Rights Reserved

कधी धनिक- वनीक श्रेष्ठांच्या रुपात तर कधी जमीनदाराच्या रुपात. हा पुरुषवर्ग होता हे निश्चित... मानवी इतिहासातली ही सामाजिक- आर्थीक घडामोड होती. तिचा उगम स्त्रियांच्या विशिष्ट जडण घडणीमध्ये नसून उत्पादनाच्या विशिष्ट नातेसंबंधामध्ये होता."[१४]

'भारतीय महिलांची विविध क्षेत्रातील प्रगतीची वाटचालीचा ' मागोवा घेण्याआधी महिलांच्या वंचीततेची कारणमीमांसा होणे गरजेचे आहे. स्त्रियांचा अर्थार्जनासाठी वेगवेगळ्या क्षेत्रात समावेश होणे म्हणजे स्त्रियांचा विकास झाला असे नव्हे, तर अजूनही पुरुषसत्ताक विचार व्यवहारातून तिची सुटका होणे गरजेचे आहे. आर्थिक स्वतंत्रता सर्वंकष स्वातंत्र्य निर्माण करू शकत नाही. आज सुद्धा स्त्रियांची आर्थिक क्षेत्रातील नगण्य प्रमाण पाहता तेही अपूर्णच असल्याचे सिद्ध होते. तरीही स्त्री प्रश्नाच्या सोडवणुकीसाठी स्त्रियांचा उत्पादकतेमध्ये वाटा वाढला पाहिजे.

**संदर्भ**

1. गुंडी डॉ. नीलिमा संपादक, स्त्रीमिती निवडक मिळून साऱ्याजणी, मौज प्रकाशन गृह, मुंबई, २०१०, पृ. ७
2. कित्ता, पृ. ४८
3. भागवत विद्युत, स्त्रीवादी सामाजिक विचार, डायमंड पब्लिकेशन्स, पुणे, २००८, पृ. २३
4. गोखले डॉ. प्रदीप, विषमतेचा पुरस्कर्ता मनू, सुगावा प्रकाशन, पुणे, तृतीयावृत्ती, २००५, पृ. ७५
5. बिसारीया पुनीत, वेदबुक से फेसबुक तक स्त्री, अटलांटिक पब्लिशर्स, नई दिल्ली, २०१५
6. पाटील शरद, (संपा.) वैदेही सीता, सत्यशोधक मार्क्सवादी, मार्च १९८२, पृ.५
7. पाटील शरद (संपा.) रामायणातील संस्कृतीसंघर्ष कोणता? सत्यशोधक मार्क्सवादी, नोव्हें.- डिसें १९८५ पृ.२१
8. पाटील शरद (संपा.) जातीव्यवस्था विकासातील ऐतिहासिक टप्पे, सत्यशोधक मार्क्सवादी, जुलै १९८२, पृ.१३
9. साळुंखे डॉ. आ.ह., हिंदू संकृती आणि स्त्री, लोकवाङ्.मयगृह मुंबई, २०१३, पृ.२
10. गायधनी प्रा. रं. ना., प्राचीन भारतीय स्त्रीजीवन, य. च. मु. विद्यापीठ, नासिक, २००४, पृ. ३
11. पाटील शरद (संपा.) जातीव्यवस्था विकासातील ऐतिहासिक टप्पे, सत्यशोधक मार्क्सवादी, जुलै १९८२, पृ. १४
12. पाटील शरद, कित्ता, पृ. १५
13. कित्ता
14. गुंडी डॉ. नीलिमा संपादक, स्त्रीमिती निवडक मिळून, मौज प्रकाशन गृह, मुंबई, २०१०, पृ. ७


Copyright © | JET Network, All Rights Reserved